स्पेशल दिवाणी दावा क्रं.१४४/२०१७
(जुना स्पे.दि.दावा क्रं.१६४/२०१५)
चंद्रशेखर वि. अब्दुल+१
नि.क.४८

**<u>साक्षीदाराचा उलटतपास ॲड.एस.के.लिखीते प्रतिवादीतर्फे पुर्ववत सुरू</u>**

२. दि.३०.०४.२०१४ रोजी माझेकडे कराराप्रमाणे देणी असलेली उर्वरित रक्कम उपलब्ध होती हे दर्शविण्याकरीता बॅकेचे दस्ताऐवज आहेत. निशाणी ५५ वर बॅकेचे पासबुक दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, पासबुक नि.५५ नुसार दि.२३.०४.२०१४ रोजी रूपये १५५३.४६ जमा असल्याचे दिसुन येतात. दि.२२. ०६.२०१४ रोजी रू.५५३.४६ जमा असल्याचे दिसुन येतात. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१३ मध्ये विक्रीपत्र करून देण्याचे ठरले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, धनादेश क्रं.१९७९७७ नुसार रू.१,२५,०००/- चे पेमेंट प्रतिवादी यांना दिल्याचे नमुद नाही. साक्षीदार सांगतात की सदर रक्कम मी नंतर नगदी दिली. हे म्हणणे खरे नाही की, सदर चेकबाबत प्रतिवादी क्रं.१ ला मी नंतर नगदी रक्कम दिल्याचे मी खोटे सांगत आहे. करारनामा करण्यापुर्वी मी प्रतिवादी क्रं.१ च्या वाद मिळकतीबाबतच्या मालकीहक्काबाबत चौकशी केली होती. मी मालकीहक्काचे तसेच महसुली दस्त पाहिले होते. मी खरेदीखताची झेरॉक्स, टॅक्स पावती, असेसमेंट पावती एवढे दस्त पाहिले होते. नंतर प्रतिवादी क्रं.१ याचे नावे खरेदीखताआधारे फेरफार झाला. मी सदर ७/१२ बघितला व प्राप्त केला. विक्रीपत्राकरीता एवढेच दस्ताऐवज आवश्यक होते. प्रतिवादी क्रं.१ यांच्याकडे झेरॉक्स प्रती होत्या.

३. हे म्हणणे खरे नाही की, माझे दि.२४.०४.२०१४ चे नोटीसनुसार प्रतिवादी क्रं.१ हा माझेकडे दि.२८.०४.२०१४ रोजी माझेकडे आला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रं.१ याने मला दुयम निबंधक कार्यालयात दि.३०. ०४.२०१४ रोजी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्रं.१ यांना माझेकडे पैसे उपलब्ध नाही व पैश्याची जुळवाजुळव झाल्यानंतर कळवितो असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीस दि.३०.०४.२०१४

रोजी दुयम निबंधक कार्यालयात येवु नका असे म्हटले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्रं.१ ला वरीलप्रमाणे तोंडी सुचना दिल्यानंतर सुध्दा दि.३०.०४.२०१४ रोजी दुयम निबंधक कार्यालयात गेलो व खोटे शपथपत्र तयार केले. दि. २४.०४.२०१४ पुर्वी माझेमध्ये व प्रतिवादी क्रं.१ मध्ये कुठलेही भांडण झाले नाही. करारनाम्यापासुन दि.२४.०४.२०१४ पर्यंत प्रतिवादी क्रं.१ हा मला विक्रीपत्र करून देणार नाही असे कधीही जाणवले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दि. २४.०४.२०१४ रोजी प्रतिवादी क्रं.१ ला नोटीस पाठवला होता.

४. दि.१७.०६.२०१४ पासुन ते जुलै २०१४ दरम्यान प्रतिवादी क्रं.१ ला करारानुसार देणे असलेली रक्कम माझेकडे उपलब्ध होती हे दर्शविणारा दस्त मी दाव्यात दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, करारनाम्यानंतर नोटीस पाठविण्यापर्यंत तसेच शपथपत्र तयार करेपर्यंत माझेकडे विक्रीपत्र करून घेण्यालायक कुठलीही रक्कम उपलब्ध नव्हती.

**<u>प्रतिवादी क्रं.१ च्या विनंतीवरून साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.</u>**

समक्ष

श्रवणोत्तर स्विकृती

(एस. के. फोकमारे)
दि.न्या.व.स्तर, उमरेड
दिनांक : ०३/१२/२०१८

(एस. के. फोकमारे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर., उमरेड